निविदेवरील निर्माण होणाऱ्या अतिरिक्त दायित्वास मान्यता देण्याबाबतचे अधिकार व कार्यपध्दती..

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र.निविदा -१२१३/(७३५/१३)/मोप्र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २२ डिसेंबर, २०१७.

संदर्भ:-

१) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१०/(१६८/२०१०)मोप्र-२ दि.३/४/२०१०
२) शासन परिपत्रक क्र निविदा ०८१२/(४२०/२०१२)मोप्र-१ दि.११//१०/२०१२
३) शासन पत्र क्र.निविदा-१२१३/७३५/२०१३/मोप्र-१ दि.१०/१०/२०१४
४) शासन निर्णय क्र.निविदा-१२१३/प्र.क्र.(७३५)/२०१३)/मोप्र-१ दि.७/९/२०१५
५) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/(३५/२०१५)जसं(आ) दि.९/९/२०१५
६) शासन निर्णय क्र.विअसु-२०१५/प्र.क्र.२१८/इमारती-२ दि.१६/१२/२०१५
७) शासन परिपत्रक क्र.सुप्रमा/०४११/(२६२/ २०११)/ मोप्र-१ दि.१०/८/२०११
८) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/(४२५/२०१५)/मध्यम प्रकल्प, दि. १६.११.२०१६.
९) शासन पत्र क्रमांक - निविदा ०४०५/८८/व्हिआयपी (२५७/२००५) मोप्र-१, दि. २०.०५.२००५
१०) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पत्र क्र. मकृखोविम-१०६/(२०३/२००६)/ प्रशा- ३/४४२८ दि.१६/१०/२०१७.
११) तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र.कांस/तापाविम/प्रशा/नियामकमंडळ (५४)/४९०६सन- २०१७ दि.११/१०/२०१७.
१२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र. ९४७१/कांता-४/निमंबै/ २०१७, दि.१३/१०/२०१७
१३) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र क्र. कोंपाविम/तां-२/निबै-७०/३४४६/ सन- २०१७,दि.१७/१०/२०१७.
१४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्रक्र. गोमपाविम/तां-३/नियामक मंडळ/ २१४/ सह, दि.१८/१०/२०१७.

प्रस्तावना:-

महाराष्ट्रातील सिंचनाचे रखडलेले प्रकल्प तसेच सिंचनाचे उद्दीष्ट गतीने पूर्ण करण्यासाठी जलसंपदा विभागांतर्गत ५ महामंडळांची स्थापना वेळोवेळी करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत राज्यात एकूण ३७६ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. येत्या काही वर्षात हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजित आहे. विविध प्रकल्पांची कामे बाहय अर्थसहाय्यातून जसे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, नाबार्ड इ. मधून विहित कालावधीत पूर्ण करण्याबाबत राज्य शासनास करारनामे (MoU) करावे लागतात. त्यामुळे असे प्रकल्प निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असते.

जलसंपदा विभागाची कामे पूर्वीपासूनच प्रामुख्याने म.सा.बां. नियमावलीतील परिच्छेद क्र.१९२ मध्ये नमूद केलेल्या ब-१ किंवा ब-२ अनुसूचित करारनामा (Scheduled Contracts) या पद्धतीने केली

जातात. क्षेत्रीय कामे करीत असताना काही बाबींच्या कामांचे परिमाण वाढल्यास सदर ब-१ किंवा ब-२ नमुन्यातील निविदांमधील कलम ३७/३८ चा वापर करण्याची तरतूद निविदेत अंतर्भूत आहे. तसेच अनपेक्षितपणे काही अतिरिक्त बाबी उद्भवल्यास म.सा.बां. नियमावलीतील परिच्छेद २२७ नुसार अतिरिक्त बाब दरसूची (E.I.R.L.) मंजूर करुन सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने अतिरिक्त बाबीचे काम करण्यात येते.

यापूर्वी अतिरिक्त बाबी तसेच करारातील कलम ३७/३८ चा वापर करुन कार्यरत निविदेची व्याप्ती वाढवून प्रकल्प संरचनेतील / संकल्पचित्रातील बदल, क्षेत्र विस्तार, को. प. बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर, धरणाची उंची व साठवण क्षमता वाढविणे तसेच नविन प्रकल्प घटक, जोड कामे, वाढीव कालव्याची लांबी, सिंचन पध्दतीतील बदल (प्रवाही, उपसा, सूक्ष्म, बंद पाईप वितरण) क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी कार्यान्वित केल्यामुळे स्वीकृत निविदेच्या तुलनेत निविदेवरील खर्चात मोठी वाढ झाल्याचेही निदर्शनास आले होते. जी कामे निविदेच्या व्याप्तीत नाहीत अशी कामे निविदा स्वीकृतीनंतर त्याच कंत्राटदाराकडून करुन घेणेची कार्यप्रणाली निश्चितच योग्य नाही. या कार्यप्रणालीत अपेक्षित पारदर्शकता राहात नाही. त्यामुळे शासन परिपत्रक संदर्भक्र २ नुसार कलम ३७/३८ चे वापरावर काटेकोर निर्बंध घालण्यात आले होते.

शासन पत्र संदर्भ क्र. ९ नुसार प्रकल्पाचे कामावर योग्य ते आर्थिक नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने प्रकल्प घटक व अनुषंगिक बाब यांच्या कामाच्या निविदा काढून कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी महामंडळाच्या अध्यक्षांची मान्यता घेण्याविषयी आदेश देण्यात आले होते. त्यावेळी महामंडळांना त्यांचेकडील प्रकल्पांसाठी ठोक स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात येत असे. तद्नंतर सन २००७-०८ पासून महामंडळांना शासनस्तरावरुन प्रकल्पनिहाय नियतव्यय उपलब्ध करुन देण्याची कार्यपध्दती अंमलात आली आहे.

या परिस्थितीचा विचार करुन संदर्भ क्र. ३ चे शासन पत्रान्वये संदर्भ क्र. ९ चे आदेश अधिक्रमीत करुन प्रकल्पावरील दायित्वावर प्रभावी नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने सर्व महामंडळांनी नियामक मंडळाच्या मान्यतेने सुयोग्य कार्यपध्दत निश्चित करावी व दायित्वाच्या मर्यादेबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे कटाक्षने पालन करावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

वरील तरतुदींना अनुसरुन संदर्भ क्र. १० ते १४ अन्वये पाचही सिंचन विकास महामंडळाच्या नियामक मंडळांनी त्यांच्या नियामक मंडळांच्या बैठकांमध्ये ठरावाद्वारे दायित्व मंजूरीबाबत सुयोग्य कार्यपध्दत निश्चित केली आहे व महामंडळाच्या अधिनियमातील अनुच्छेद क्र.२५ अन्वये शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करून शासन स्तरावरून महामंडळास सूचना देणे विषयी विनंती केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन सिंचन प्रकल्पावरील आर्थिक दायित्वावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने तसेच अनिवार्य प्रकरणी अतिरिक्त दायित्व मंजुरीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते.

या पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

शासन आदेश :

मार्गदर्शक सूचना-

१.१ सिंचन प्रकल्पावरील दायित्व मर्यादित ठेवण्यासाठी प्रकल्प कार्यान्वितीकरणासाठी निश्चित केलेल्या प्रत्येक कराराच्या किंमतीवर नियंत्रण ठेवावे. कराराच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता यांची राहील.

१.२ अभियांत्रिकी बदलामुळे/ क्षेत्रिय परिस्थितीमुळे कराराचे परिमाणात वाढ संभवत असल्यास किंवा अतिरिक्त बाब कार्यान्वित करणे अनिवार्य असल्यास प्रथम तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम अधिकाऱ्याने खालील बाबी सविस्तर कारणमिमांसेसह प्रमाणित करुन अभिलेखावर ठेवाव्यात.

अ) करारातील अनुसूची "ब" मधील नमूद परिमाणापेक्षा वाढीव परिमाण / अतिरिक्त बाबी उद्भवण्याची कारणमिंमासा व कार्यान्वित करण्याची तांत्रिक गरज यामुळे होणारी फलनिष्पत्ती. (विवक्षित फलनिष्पत्तीची शक्यता नसताना केवळ निविदा किंमतीवर वाढीव दायित्व मंजुरीचे अधिकार आहेत म्हणून अशा मान्यता देऊ नयेत.)

ब) सदर वाढीव परिमाण/ अतिरिक्त बाब कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र अभिकरणाऐवजी अस्तित्वात असलेल्या करारांतर्गतच प्रस्तावित करण्यामागची कारणमिमांसा.

क) प्रस्तावित वाढीव परिमाण/ अतिरिक्त बाब कार्यान्वित केल्यामुळे येणारा आर्थिक भार.

१.३ सदर आदेश केंद्र अर्थसहाय्यित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना,आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यातील प्रकल्प तसेच अवर्षण प्रवण भागातील प्रकल्प पुर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाचे अर्थसहाय्याने प्रस्तावित केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना व अनुशेषांतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या करारांमधील वाढीव दायित्वासाठी लागू राहतील.

२.० निविदेतील वाढीव दायित्वास मान्यता देण्याचे अधिकार:-

२.१ कलम ३७/३८ किंवा अतिरिक्त बाबीमुळे निविदेची किंमत (भाववाढ वगळून) वाढणार नसल्यास म्हणजेच सदर खर्च करारातील अन्य संभाव्य बचतीमधून भागणार असल्यास अशा प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार सदर वाढीव खर्चासह संबंधित कामास तांत्रिक मान्यता देणेस सक्षम अधिका-यास असतील.

२.२ कलम ३७/३८किंवा अतिरिक्त बाबीमुळे होणारी कराराची एकत्रित किंमतवाढ(Cumulative rise) (भाववाढ वगळून) स्वीकृत निविदा कामाच्या व्याप्तीच्या मर्यादेत (Within the scope of work)५ टक्के किंवा रु. ५.०० कोटी यापैकी जे कमी आहे, अशा दायित्व प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार महामंडळाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहमतीने महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना राहतील. मात्र तत्पूर्वी करारावरील एकूण वाढीव खर्च ५ % किंवा रु. ५.०० कोटी यापैकी जे कमी आहे

त्या मर्यादेत राहील,याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य अभियंता यांनी देणे गरजेचे असेल व याबाबत मुख्य अभियंता हे जबाबदार असतील.तसेच अशा Scope of work मध्ये यानंतर कोणतीही वाढ होऊन सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावित करता येणार नाही.

२.३ कलम ३७/३८किंवा अतिरिक्त बाबीमुळे होणारी कराराची एकत्रित किंमतवाढ (Cumulative rise) (भाववाढ वगळून) ५% पेक्षा अधिक किंवा रु. ५.०० कोटीपेक्षा अधिक होत असल्यास अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता/ अद्ययावत सुप्रमा प्राप्त किंमतीच्या मर्यादेच्या अधीन राहून महामंडळाच्या नियामक मंडळास राहतील.

३.० निविदेतील वाढीव दायित्वास मान्यता देण्याची कार्यपद्धती :

३.१ वरील परिच्छेद क्र.२.१, २.२ व २.३ येथे नमूद केलेल्या दायित्व मान्यतेचे अधिकारांचा वापर करतांना किंवा याबाबतचे प्रस्ताव सक्षम प्राधिकरणास पाठवितांना शासन निर्णय संदर्भ क्र.८ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी संबंधित मुख्य अभियंता व कार्यकारी संचालक यांची राहील.

३.२ निविदा करारातील शर्त ३७/३८ किंवा अतिरिक्त बाब मंजूर करुन मूळ कराराच्या भौतिक व्याप्ती बाहेरील कोणत्याही कामास मान्यता देऊ नये. को.प. बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतर, धरण उंचीवाढ, नविन प्रकल्प घटक , जोड कामे, वाढीव कालव्याची लांबी, सिंचन पध्दतीतील बदल, वाढीव उपसा योजना इत्यादी कामे करार शर्त ३७/३८ किंवा अतिरिक्त बाब मंजूर करुन कार्यान्वित करु नयेत, अशी अनियमितता झाल्यास त्यास सर्वस्वी शर्त ३७/३८ किंवा अतिरिक्त बाब मंजूर करणारा अधिकारी जबाबदार राहील.

३.३ निविदा शर्त ३७/३८ किंवा अतिरिक्त बाबीमुळे उद्भवणा-या अतिरिक्त दायित्वास सक्षम स्तरावरुन मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील प्राधिकारानुसार कलम ३७/३८ किंवा अतिरिक्त बाब सक्षम स्तरावर मंजूर करण्यात यावी.

३.४ संबंधित महामंडळाने प्रकल्पावरील अतिरिक्त दायित्वाला सक्षम स्तरावर मान्यता घेऊन त्याचा समावेश करुन प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता सक्षम स्तरावर घ्यावी. तोपर्यंत अतिरिक्त बाब (Extra item) आणि अतिरिक्त परिमाणाच्या (Extra quantity) कामाचे लेखी आदेश देण्यात येऊ नयेत.तसेच अशा मान्यतेशिवाय कोणत्याही अतिरिक्त बाबीची वा वाढीव परिमाणाची कामे कार्यक्षेत्रावर करु नयेत किंवा त्यांची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदवू नयेत. याबाबतची जबाबदारी संबंधित अधीक्षक अभियंता व त्याचे अधिनस्त क्षेत्रिय अधिकारी यांची राहील.

३.५ अतिरिक्त बाबी संदर्भात निविदेअंतर्गत कामाचा स्वीकृत दर (कंत्राटदाराचा देकार) अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असेल तर अतिरिक्त बाबीवरील कामासाठी त्यावेळी प्रचलित असलेल्या / अमलात असलेल्या DSR चा दर लागू राहील. तसेच स्वीकृत दर (कंत्राटदाराचा देकार) अंदाजपत्रकीय दरापेक्षा जर कमी असेल तर अतिरिक्त बाबीवरील कामासाठीचा दर DSR पेक्षा देकाराच्या टक्केवारीप्रमाणे कमी राहील.

३.६.१ दायित्वाच्या प्रस्तावास मान्यता देण्यापूर्वी सदर प्रस्तावांची जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या समिती मार्फत सखोल तपासणी करण्यात यावी तसेच प्रस्तावाच्या आवश्यकतेची सत्यासत्यता (Genuineness) पडताळणी करावी असे वित्त विभागाने सूचित केले आहे. त्यासाठी महामंडळ स्तरावर व शासन स्तरावर समिती गठित करण्यात येत असून सदर दायित्वाचे प्रस्ताव प्रथम महामंडळस्तरावरील निम्नलिखित समिती मार्फत तपासण्यात यावेत. या समितीची रचना खालील प्रमाणे राहील.

अ.क्र.	महामंडळस्तरावरील समितीची रचना	रचनेतील पद
१	संबंधित महामंडळाचे कार्यकारी संचालक	अध्यक्ष
२	संबंधित मुख्य अभियंता	सदस्य
३	संबंधित अधीक्षक अभियंता	सदस्य
४	संबंधित विभागाचे लेखापाल	सदस्य सचिव

वरील समितीने दयित्वाच्या प्रस्तावांची सखोल छाननी करावी व सुयोग्य/स्वीकारार्ह प्रस्तावांची सविस्तर कारणांसह शिफारस करावी. नियामक मंडळासमोर मान्यतेस्तव सादर करावयाचे प्रस्ताव छाननीसाठी खालील परिच्छेदात नमूद केलेल्या शासन स्तरावरील समितीकडे प्रथमत: सादर करावेत.

३.६.२ महामंडळ स्तरावरुन शिफारस केलेले प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी शासन स्तरावरील निम्नलिखित समितीने करावी व समितीने शिफारस केलेले/स्वीकारार्ह असलेले प्रस्ताव महामंडळाने त्यांच्या धारिकेतून नेहमीच्या कार्यपध्दतीनुसार व्यवस्थापकीय संचालक व मा.अध्यक्ष यांच्या मंजुरीसह नियामक मंडळासमोर पुढील मान्यतेस्तव सादर करावेत.

अ.क्र.	शासन स्तरावरील समितीची रचना	रचनेतील पद
१	सचिव (प्रकल्प समन्वय)	अध्यक्ष
२	मुख्य अभियंता (द व प्र) व स. स.	सदस्य
३	महामंडळा बाहेरील नियुक्त मुख्य अभियंता	सदस्य
४	संबंधित उप सचिव	सदस्य सचिव

४.० महामंडळातंर्गतच्या कामाचे सुयोग्य व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून व या संदर्भात सर्व महामंडळांची समान कार्यपध्दती / एकसूत्रता राहण्यासाठी महामंडळ अधिनियमातील अनुच्छेद २५ अंतर्गतच्या तरतुदीनुसार वरील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

५.० सदर शासन निर्णय नियोजन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.का.१४३३,दिनांक १५/११/२०१७व वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र २८२/व्यय-१२, दिनांक ८/१२/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व सर्वोच्च सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपब्लध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१७१२२२१४५६४८६८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2017.12.22 15:05:47 +05'30'

(सं.रा. तिरमनवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर
२. खाजगी सचिव, मा.मंत्री, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
३. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
४. मा.विधानसभा /विधानपरिषद सदस्य सर्व
५. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
६. स्वीय सहाय्यक, सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
७. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (दवप्र) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
८. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
९. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (कृपातलं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (पा.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई
११. सर्व तांत्रिक उपसचिव/अवर सचिव/उपअभियंता, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई
१२. सर्व कार्यकारी संचालक
१३. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
१४. महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन, औरंगाबाद
१५. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
१६. मोप्र १ कार्यासनसंग्रहार्थ